सकाळ » TODAY
सिंधुदुर्ग, मंगळवार, १८ ऑक्टोबर २०२२



दोडामार्ग : मंदिर परिसराची स्वच्छता करताना विद्यार्थी.

# दोडामार्ग महाविद्यालयातर्फे स्वच्छता

**दोडामार्ग :** येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयाच्या एनएसएस विभागामार्फत कसई येथील ग्रामदेवतेच्या मंदिराची स्वच्छता करण्यात आली. स्वच्छ भारत अभियानांतर्गत येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे कसई दोडमार्ग ग्रामदेवता श्री सातेरी देवी मंदिराच्या परिसराची स्वच्छता करण्यात आली. राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. दिलीप बर्वे व डॉ. राजेंद्र इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली उपक्रम राबविण्यात आला. यावेळी स्वयंसेवकांनी मंदिरातील प्लास्टिक कचरा, परिसरातील प्लास्टिक आणि इतर कचरा जमा करून नगरपंचायतीच्या कचरा कुंडीमध्ये जमा केला. येथील विहीर, सांस्कृतिक रंगमंच, सभा मंडप झाडून स्वच्छ केला. या उपक्रमात सर्व स्वयंसेवकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. प्राचार्य डॉ. सुभाष सावंत यांनी मार्गदर्शन केले. डॉ. इंगळे यांनी आभार मानले.